नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 10/08/2020 (सोमवार)
(सकाळ)

---

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर शिवनगर रामटेक रोड मौदा येथे दिनांक 08/08/2020 चे 22:00 वा. ते दिनांक 09/08/2020 चे 06:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– संजय मधुकर भोयर, वय 42 वर्ष, रा. शिवनगर रामटेक रोड मौदा यांच्या घराच्या अंगणात एमएच– 40/ आर– 4392 क्रमांकाची पॅशन प्लस मोटरसायकल उभी करून ठेवलेली होती. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची कि. 15,000/–रू. मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवा कुथे 9764007720 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. कळमेश्वर :– दि. 07/08/2020 चे 17:00 वा. ते 17:05 वा. चे सुमारास आरोपी क्र. 1) संदेश उर्फ पिन्टु रमेश मेश्राम, वय 24 वर्ष, रा. वाढोना, ता. कळमेश्वर याने फिर्यादी यांची बहीण वय 36 वर्ष हिचा शारीरिक संबंध करते वेळीचा त्याचे मोबाईल मध्ये चोरून अश्लील व्हिडीओ बनवुन तो व्हिडीओ ईतरांना प्रसारीत केला. तसेच आरोपी क्र. 2) बालु गदाईत, रा. म्हसेपठार शंकरपट याने खेमारी या व्हाटसॲप गृपवर प्रसारीत करून तीची बदनामी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 354 (क), 500 भादंवि. सहकलम 66(ई), 67 माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. 1 ला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. मुळुक 9552564047 हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 18 कि.मी अंतरावर मौजा डोंगरमौदा येथे दिनांक 08/08/2020 चे 18.00 वा ते 18.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– नारायण जनार्धण नागपूरे, वय 43 वर्ष, रा. डोंगरमौदा ता. कुही हे आपल्या घराचे आवारात उभे असता आरोपी क्र. 1) चंद्रकांत हरीचंद भोतमांगे, वय 44 वर्ष 2) विनोद हरीचंद भोतमांगे, वय 38 वर्ष 3) शिवदास आंनदराव भोतमांगे, वय 41 वर्ष 4) राहुल नत्थु भोतमांगे, वय 30 वर्ष 5) भुपेश राजु भोतमांगे वय 23 वर्ष व 6) जगन आनंदराव भोतमांगे वय 27 वर्ष सर्व रा. डोंगरमौदा तह कुही जि. नागपूर यांनी फिर्यादीच्या घरा समोरील रोडवर उभे राहुन फिर्यादीस शिवीगाळ केली. तेव्हा आरोपी क्र. 1) चंद्रकांत हरीचंद भोतमांगे याने फिर्यादीस ''तु माझ्या पत्नीला टोमणे का मारते व तु तिला पाहुण शिवीगाळ का करतो'' असे म्हणुन आरोपीतांनी फिर्यादीस शिवीगाळ केली. त्यावरून फिर्यादीने ''मी तिला टोमणे मारले नाही'' असे म्हटले असता आरोपी क्र. 4 याने फिर्यादीस त्याच्या घराच्या आवारात येवुन त्याला शिवीगाळी केली. तेव्हा आरोपी क्र. 1

व 3 यांनी फिर्यादीस हातबुक्कीने व काठीने मारहाण करून जखमी केले. त्यावरून फिर्यादीची पत्नी, मुलगा व आई हे मध्यस्ती आले असता सर्व आरोपीतांनी त्यांना काठीने व हातबुक्कीने मारहाण करून फिर्यादी व त्यांच्या कुटुंबाला जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीतांविरुध्द कलम 143, 147, 448, 323, 504, 506 भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. किशोरकुमार वैरागडे 9923795086 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत मौजा सावंगी येथे दिनांक 08/08/2020 चे 19.00 वा. दरम्यान सौ. दुर्गा दिपक वाडबुद्धे, वय 25 वर्ष, रा. सावंगी हि नवविवाहीत असुन तिच्या डोक्याला त्रास झाल्यामुळे ती बेशुद्ध पडली. तिला उपचाराकामी प्रथम खजगी रूग्णालय सावनेर त्यानंतर शासकीय दवाखाना येथे नेले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी तिला तपासुन मेयो हॉस्पीटल, नागपुर येथे रेफर केले. तिला मेयो हॉस्पीटल नागपूर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन दि. 08/08/2020 चे 22:05 वा. मृत घोषित केले. डॉक्टरांनी मृतक हिने विषारी ओषधी प्राशन केल्याने तिचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे सफौ देवशंकर गुप्ता, पो. स्टे. सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ देवशंकर गुप्ता 9511247261 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर